# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


दिनांक 13/03/2023 (सोमवार) सायंकाळ

---

### अपहरण करून अतिप्रसंग करणाऱ्या आरोपीला कोर्टातुन शिक्षा

**पो.स्टे. बेला** :– फिर्यादी यांच्या रिपोर्ट वरुन पो.स्टे. बेला येथे अप. क्र. २४२/२०१८ कलम ३६३, ३६६, (अ), ३७६(२) (एन) भांदवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद झालेला होता.

फिर्यादीची अल्पवयीन मुलगी हिला आरोपी नामे– अमित चंद्रभान कोकुर्डे, वय २५ वर्ष रा. कोहळा ता. उमरेड जि. नागपूर याने पळवुन नेल्याचे रिपोर्ट वरून कलम ३६३ भांदवि अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला होता. तपासा दरम्यान यातील आरोपीने पिडीतेसोबत लैगिक अत्याचार केल्याचे निष्पन्न झाल्याने सदर गुन्हयात कलम ३६६ (अ), ३७६ (२) (एन) भादंवि सहकलम ४, ८ पोक्सो अन्वये वाढ करण्यात आली.

सदर प्रकरणाचे तपास सपोनि. फुल्लरवार पोस्टे बेला यांनी करून सदर प्रकरण न्याय प्रविष्ठाकरीता मा. कोर्टामध्ये सादर केले. आज दिनाक १३/०३/२०२३ रोजी मा. कोर्ट विद्यमान न्यायाधीशांनी वरील नमुद आरोपीस कलम ३६३ भादंवि मध्ये ०१ वर्ष सश्रम कारास व १०००/–रू. दंड दंड न भरल्यास ०१ महिना साधी कैद कलम ३७६(३) भादंवि मध्ये २० वर्ष सश्रम कारावास व ५०००/–रू. दंड दंड न भरल्यास ०४ महिने साधी कैद अशी शिक्षा ठोठावली आहे.

कोर्ट कामात पैरवी अधिकारी म्हणुन पोलीस हवालदार संजय इंगोले पोस्टे. बेला यांनी मदत केली आहे.

### दुखापत

**पो.स्टे. कन्हान** :– अंतर्गत १२ किमी अंतरावर सालवा कन्हान येथे दिनांक १२/३/२०२३ चे १०.०० वा. ते १०.३० वा. दरम्यान फिर्यादी नामे– ज्ञानेश्वर चिंधुजी वंजारी, वय ५५ वर्ष, रा. सालवा ता. मौदा व आरोपी नामे– केशवराव बापुराव वकलकर वय ५५ वर्ष रा. सालवा कन्हान ता. मौदा हे एकाच गावात राहणारे असुन नमुद घटना ता. वेळी ठिकाणी आरोपी याने फिर्यादीचे शेतात गड्डा केला त्यावरुन फिर्यादी याने आरोपीस हटकले की तु माझ्या शेतात गड्डा का करतो, यावरुन आरोपीने फिर्यादीला शिवीगाळ करुन पावडयाच्या लाकडी दंडयाने मारझोड केली व जिवाने मारण्याची धमकी दिली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. कन्हान येथे आरोपीविरुध्द कलम ३२४, ५०४, ५०६ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास सफौ ब. नं. ३६० पाल मो न ९५५२५१७२६८ हे करीत आहे.


**पोलीस माहिती कक्ष**

**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**